



**बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, धर्मवाद आणि कष्टकरी जनतेच्या लुटीविरोधात!**
**रोजगार, शिक्षण, आरोग्यसेवा, निवास आणि झुंजार जन-एकजुटीसाठी!**

# भगतसिंह जनअधिकार यात्रा

(12 मार्च 2023 - 14 एप्रिल 2023)

बंधू-भगिनींनो आणि साथींनो!

देश एका अभूतपूर्व संकटातून जात आहे. बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, आर्थिक विषमतेने सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. करांचा बोजा लादून महागाईला शिखरावर पोहोचवले गेले आहे. कष्टकऱ्यांची लूट सुलभ करून धनदांडग्यांची तिजोरी भरण्याची व्यवस्था केली जात आहे. काँग्रेसने सुरू केलेल्या उदारीकरण-खाजगीकरणाच्या लुटखोर धोरणांच्या घातक वाऱ्याचे रुपांतर मोदींच्या राजवटीत भयंकर वादळात झाले आहे. **मोदी सरकारने भाषणबाजी खूप केली, परंतु कष्टकरी जनतेचे जीवन मात्र नरक बनले आहे. बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार आणि वाढती लूट यामुळे जनता एवढी कधीच त्रस्त झाली नव्हती.** सर्वसामान्य जनतेला त्यांच्या हक्कांसाठी एकत्र येण्यापासून रोखण्यासाठी आणि सरकारचे अपयश लपवण्यासाठी भाजप सर्वसामान्यांना धर्मवाद-जातीयवाद-अंधराष्ट्रवाद अशा खोट्या मुद्द्यांमध्ये अडकवत आहे. 'राष्ट्रवादा'चा ढोल बडवणाऱ्या भाजपने लष्करातील जवानांचे निवृत्ती वेतन, भत्ते आणि आता नोकऱ्याही गिळंकृत केल्या आहेत. प्रसारमाध्यमांचा मोठा भाग बड्या भांडवलदारांच्या ताब्यात आहे. आज प्रसारमाध्यमे दंगलखोरांप्रमाणे समाजात विष पसरवत आहेत.

भाजप आणि काँग्रेसव्यतिरिक्त, आप, सपा, बसपा, राजद, जद(यू), राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, अकाली दल, द्रमुक, अण्णाद्रमुक, वायएसआर काँग्रेस, तृणमूल काँग्रेस इत्यादी सर्व लहान आणि प्रादेशिक पक्षसुद्धा आपापल्या पद्धतीने त्यांच्या-त्यांच्या राज्यातील आणि प्रदेशातील फक्त भांडवलदार, श्रीमंत शेतकरी, कंत्राटदार, दलाल, मध्यस्थ, बिल्डर इत्यादींची सेवा करतात. ते सुद्धा धर्माच्या, जातीच्या, प्रदेशाच्या नावावर जनतेत फूट पाडून आपली निवडणुकीची पोळी भाजतात. स्वतःला कष्टकरी जनतेचे प्रतिनिधी म्हणवणारे सीपीआय, सीपीएम, सीपीआय-एमएल (लिबरेशन) सारखे पक्ष कष्टकऱ्यांच्या बाजूचे दावे खूप करतात पण सेवा शोषक वर्गाचीच करतात. ते प्रामुख्याने मोठ्या भांडवलदारांऐवजी लहान आणि मध्यम मालक-व्यापारी आणि श्रीमंत शेतकऱ्यांची सेवा करतात. जिथे त्यांची सरकारे आहेत तिथेही उदारीकरण-खाजगीकरणाची धोरणे बिनदिक्कतपणे राबवली जात आहेत.

आज जनतेला आपल्या मुक्तीचा कुठलाही उपाय समोर दिसत नाहीये, पण पर्यायाचा हा अभावच आपल्या आणि आपल्या देशाच्या नशिबी आहे असे नाही. सध्याची ही परिस्थिती बदलण्यासाठी देशातील धाडसी तरुण, कष्टकरी मजूर-शेतकरी नक्कीच पुढे येतील. म्हणूनच आम्ही आपल्या महान शहीद क्रांतिकारी पूर्वजांच्या क्रांतिकारी वारशाने प्रेरित होऊन **'भगतसिंह जनअधिकार यात्रा'** सुरू केली आहे. **या यात्रेचा उद्देश समाजात नवीन क्रांतिकारी प्रबोधन घडवून आणणे आणि जनतेला आपल्या खऱ्या समस्यांबद्दल जागरुक करून संघटित करणे हा आहे.**

## मोदी सरकारचा रोजगारावरचा हल्ला आमच्या जगण्याच्या हक्कावरचा हल्ला आहे!

2014 मध्ये दरवर्षी दोन कोटी नोकऱ्या देण्याच्या आश्वासनावर मते मागणाऱ्या नरेंद्र मोदींच्या राजवटीत कोट्यवधी लोकांना रोजीरोटी गमवावी लागली. नोटबंदी, जीएसटी आणि कोरोना काळातील गैरव्यवस्थापनाने विशेषतः असंघटित क्षेत्रातील कष्टकरी लोकांच्या पोटावर लाथ मारली आहे. जनतेच्या कमाईवर उभ्या असलेल्या सरकारी उपक्रमांचे खाजगीकरण करून त्यांना भांडवलदारांच्या ताब्यात दिले जात आहे. याच्या परिणामी ज्यांच्या खिशात पैसे आहेत त्यांच्यापर्यंतच चांगले शिक्षण आणि उपचार मर्यादित झाले आहेत.

देशात सध्या **32 कोटी लोकसंख्येला** बेरोजगारीचा सामना करावा लागत आहे. **शासकीय विभागातील लाखो रिक्त पदे भरण्याऐवजी ही पदेच समाप्त केली जात आहेत. अग्निवीर योजनेच्या** नावाखाली सरकारने लष्करातील कायमस्वरूपी नोकरीही गिळंकृत केली

आहे. **नवीन शैक्षणिक धोरण-2020** हा शिक्षणातील धर्मवाद, खाजगीकरण वाढवणारा व रोजगार विरोधी दस्तऐवज आहे. गेल्या आठ वर्षांच्या मोदी राजवटीत केंद्र सरकारने **केवळ 7 लाख 22 हजार 311 लोकांना** नोकऱ्या दिल्या आहेत, जेव्हाकी अर्ज करणाऱ्यांची संख्या **22 कोटी 5 लाख 99 हजार 238** एवढी होती. तीव्र बेरोजगारीमुळे निराश होऊन लोक मृत्यूला कवटाळत आहेत. 2017 ते 2021 या चार वर्षात **7,20,611 लोकांनी आत्महत्या** केल्या ज्यामध्ये बहुतांश रोजंदारीवर काम करणारे आणि शेतमजूर, गरिब शेतकरी, विद्यार्थी-युवक आणि छोटे "स्वयंरोजगार" करणारे लोक आहेत. **काय हेच ते "अच्छे दिन" आहेत ज्याचे गुणगान भ्रष्ट गोदी मीडिया चोवीस तास गळा फाडून करत होते? सरकार जर जनतेला रोजगारासारखा अधिकार देऊ शकत नसेल तर ते आहेच कशासाठी?** बेरोजगारी ही नैसर्गिक आपत्ती नाही किंवा ती लोकसंख्येमुळेही नाही. काम करू शकणारे लोक असतील, विकासाची गरज असेल आणि संसाधने असतील तर लोकांनी बेरोजगार राहण्याचे कारण नाही. पण नफेखोर व्यवस्थेत संसाधनेही निष्क्रिय राहतात, लोकांनाही रिकामे फिरावे लागते आणि विकासाची मलई फक्त श्रीमंतांनाच मिळते, सर्वसामान्यांना मिळते ते म्हणजे श्रीमंतांनी फस्त करून उरलेले उष्टे.

## महागाईचा वाढता मार, जबाबदार मोदी सरकार!

सत्तेत येण्यापूर्वी नरेंद्र मोदी आणि भाजपने आणखी एक जी घोषणा खूप वापरली होती, ती होती "बहुत हुई महंगाई की मार, अबकी बार मोदी सरकार"! पण आपल्या 8 वर्षांच्या कार्यकाळात मोदी सरकारने महागाईच्या बाबतीत सर्व विक्रम मोडले आहेत. खाद्यपदार्थांपासून ते स्वयंपाकाचा गॅस आणि पेट्रोलियम पदार्थांचे दर गगनाला भिडले आहेत. एका अहवालानुसार, सामान्य माणसाला आपल्या उत्पन्नातील **53 टक्के** रक्कम फक्त अन्नावर खर्च करावी लागते, तर श्रीमंतांची उत्पन्नाच्या केवळ **12 टक्के** रक्कम अन्नावर खर्च केली जाते. व्यवस्थेने निर्माण केलेल्या मंदीचा संपूर्ण भार सर्वसामान्य जनतेवर टाकण्यात आला आहे. 450 रुपयांचा गॅस सिलिंडर 1130 रुपयांवर, 55 रुपये प्रति लिटर मिळणारे डिझेल 95 रुपयांवर आणि 75 रुपये प्रति लिटर मिळणारे पेट्रोल 105 रुपयांवर पोहोचले आहे. **मोदी सरकारने पेट्रोलियम उत्पादनांवर कर लादून जास्तीत जास्त पैसा गोळा केला आहे, ज्याचा वापर श्रीमंत लोकांना करामध्ये सूट देण्यात, राजकारणी आणि वरिष्ठ अधिकारी यांचे मोठाले पगार, निवृत्तीवेतन आणि चैनीसाठी केला जातो.** पेट्रोलियम पदार्थांच्या किमतीत होणारी प्रत्येक वाढ सर्वसाधारणपणे महागाई वाढवण्यास कारणीभूत ठरते. **सरकार जनतेवर सातत्याने करांचा बोजा वाढवत आहे, तर दुसरीकडे भांडवलदारांवर लादलेले कर कमी करत आहे!** सरकारी आणि निमसरकारी बँकांनी जनतेच्या कष्टाचा पैसा अंबानी-अदानी-टाटा-बिर्ला यांना कर्जाच्या रूपात दिला. मोदी काळात 2015 ते 2021 पर्यंतच्या 6 वर्षात 11 लाख 19 हजार कोटी रुपयांचे कर्ज बुडीत खात्यात टाकले गेले ज्यापैकी केवळ एक लाख कोटी रुपये वसूल झाले, म्हणजे 10 लाख 19 हजार कोटी रुपये भांडवलदारांनी सरळ गिळंकृत केले. 2004 ते 2014 या 10 वर्षात कर्जमाफीची रक्कम 2 लाख 22 हजार कोटी रुपये होती! **25 लाखापेक्षा जास्त रुपयांचे कर्ज घेऊन ते न चुकवणाऱ्या 'विलफुल डिफॉल्टरांची' संख्या** 15,000 **पर्यंत पोहोचली आहे, जनतेचा पैसा चोरून 40 धनाढ्य लोक देश सोडून पळून गेले आहेत. सरकारच्या संगनमताशिवाय हे शक्य आहे का? या चोरीची किंमतही महागाईच्या रूपाने आपल्यावर लादली जाते.** वाढती महागाई म्हणजे दुसरे तिसरे काही नसून सरकार आणि लुटारूंनी जनतेवर केलेला थेट हल्ला आहे हे उघड आहे.

**महागाई!**
पेट्रोल: 105 रु.
गॅस: 1130 रु.
तेल: 200 रु.
दुध: 60 रु.

## तोंडात राम, काखेत सुरी : 'संस्कारी' भाजपच्या भ्रष्टाचाराचे खरे "चाल-चेहरा-चरित्र"!

**नैतिकता आणि संस्कारांचे गुणगान गाणाऱ्या भाजपच्या मंडळींनी उघड भ्रष्टाचाराचे नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत.** 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा' या घोषणेचा फोलपणा उघड झाला असून, खाणे आणि खाऊ घालणे दोन्हीही जोरात सुरू आहेत. **राफेल डील, पीएम केअर, व्यापम घोटाळ्यापासून ते अडानींच्या महाभ्रष्टाचारापर्यंत** संपूर्ण घटना याचा जिवंत पुरावा आहे. **हिंडेनबर्गच्या खुलाशांनी अदानी सोबत संगनमताने केलेला भ्रष्टाचार स्पष्टपणे उघड झाला आहे.** मोदींच्या राजवटीत भाजपच्या लोकांचा आणि त्यांच्या आवडत्या श्रीमंत धनाढ्यांचा नक्कीच विकास झाला आहे! म्हणूनच धनदांडगे भाजपवर नोटांचा वर्षाव करत आहेत! त्याबदल्यात भाजप धर्मवादाचे वातावरण तापवून जनतेची एकजूट तोडत असून भांडवलदार धार्जिण्या धोरणांनी धनदांडग्यांना मालामाल करत आहे. आपल्यासाठी एकच गोष्ट ठेवली आहे ती म्हणजे आधी मेहनत करून भांडवदारांची तिजोरी भरायची आणि मग धार्मिक दंगलीत एकमेकांची डोकी फोडायची! **जरा विचार करा की कोणत्याही धनदांडग्या-नेत्या-मंत्री-नोकरशहाचे घर कधीही जातीय दंगलीत आणि मारामारीत का जाळले जात नाही, ते तलवारी-त्रिशूल घेऊन धावताना, जाळपोळ करताना का दिसत नाहीत? त्यांच्या मुलांना क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष करून पैसा छापण्याची संधी दिली जाते आणि तुमच्या मुला-मुलींच्या हातात धार्मिक भावना भडकावून दंगलीचे साहित्य सोपवले जाते. जरा विचार करा की किती दिवस आपण या षडयंत्रांना बळी पडत राहणार आहोत?**

**मोदी सरकारचा भ्रष्टाचार**
राफेल घोटाळा, पीएम केअर्स, अदानी घोटाळा, व्यापम, ...
उद्योगपतींना 10 लाख 19 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ
माल्या, नीरव मोदी सारखे 40 धनाढ्य पळून गेले!

## गरिबी आणि आर्थिक विषमता विक्रमी पातळीवर

आपल्या देशातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या **23 कोटींपर्यंत** पोहोचली आहे जी जगातील सर्वात जास्त आहे. तसे पाहता ही दारिद्र्यरेषा स्वतःच एक विनोद आहे. ही भूकबळीची रेषा आहे. ऑक्टोबर 2022 च्या जागतिक भूक निर्देशांकात 121 देशांच्या यादीत आपला देश **107 व्या स्थानावर** आहे! 2019 च्या शेवटच्या आकडेवारीनुसार येथे **8,24,000 अर्भकांचा मृत्यू झाला. म्हणजे दर दोन मिनिटाला तीन मुलं मृत्यमुखी!** उपासमार आणि बालमृत्यूच्या बाबतीत आपण आफ्रिकेतील गरीब देशांपेक्षाही खूप मागे आहोत. 1981 मध्ये भारतातील वरच्या **10 टक्के श्रीमंतांची** संपत्ती देशाच्या एकूण संपत्तीच्या **45 टक्के** होती, जी 2012 मध्ये वाढून **63 टक्के** आणि 2022 मध्ये **80 टक्क्यांहून** अधिक झाली. सध्या देशातील एकूण संपत्तीपैकी **90 टक्के संपत्ती** फक्त **30 टक्के लोकांकडे** जमा झाली आहे. वरच्या **1 टक्के श्रीमंतांकडे** देशातील **40 टक्क्यांहून अधिक संपत्ती** जमा झाली आहे, तर खालच्या **50 टक्के** लोकांकडे एकूण संपत्तीच्या फक्त **3 टक्के** आहे. **एका बाजूला संपत्तीचा वाढता डोंगर आणि दुसरीकडे भुकेने मरणारी मुलं!** हे आहे सध्याच्या नफेखोर व्यवस्थेचे सत्य ज्याबद्दल भगतसिंह इशारा देत होते.

## धार्मिक कट्टरतेवर हल्ला बोल!

जनतेने वर उल्लेखलेल्या खऱ्या मुद्द्यांचा विचार करू नये यासाठीच **धार्मिक कट्टरतेचा भस्मासुर** खत-पाणी देऊन उभा केला गेला आहे. इंग्रजांनी 'फोडा आणि राज्य करा' या धर्मवादी धोरणाखाली लोकांमध्ये फूट पाडून राज्य केले आणि शेवटी देशाचे विभाजन केले. केवळ मुस्लिम लीगच नाही तर आरएसएस व हिंदू महासभेचे आदर्श सावरकर यांनीही 'द्विराष्ट्र सिद्धांता'चा पुरस्कार केला ज्यामुळे देशाची फाळणी झाली. स्वातंत्र्यानंतर सत्तेवर आलेल्या धनदांडग्यांच्या लोकप्रतिनिधींनीही जनतेला आपापसात भांडायला लावण्यासाठी कोणतीही कसर सोडली नाही. काँग्रेस आणि विविध प्रादेशिक पक्षही मवाळ धर्मवादी कार्ड खेळत आले आहेत किंवा खोट्या धर्मनिरपेक्षतेचा जप करत आले आहेत. जातीय द्वेष पसरवून जनआंदोलनांना कमकुवत करण्याचा संघ परिवार आणि भाजपचा अजेंडा राहिला आहे. त्या बदल्यात त्याला भांडवलदारांकडून पैशाने भरलेल्या थैल्या मिळतात. 2014 मध्ये सत्तेत येण्यापूर्वीच भाजपवर भांडवलदारांच्या पैशांचा वर्षाव सुरू झाला होता. **2012-13 ते 2015-16 या चार वर्षातच पाच राष्ट्रीय पक्षांना देणगी स्वरूपात भांडवलदारांकडून 956 कोटी 57 लाख रुपये मिळाले, ज्यातील 74 टक्के म्हणजे 705 कोटी 81 लाख रुपये एकट्या भाजपला मिळाले!** 2021-22 या वर्षातच भाजपला **615 कोटी रुपयांच्या** कॉर्पोरेट देणग्या मिळाल्या आहेत, जे इतर सर्व निवडणूक पक्षांना मिळालेल्या एकूण देणग्यांपेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. 2020 या आर्थिक वर्षात भाजपची एकूण घोषित संपत्ती **4,847 कोटी 78 लाख रुपये** होती, जेव्हाकी 2017 मध्ये ती 1,213 कोटी रुपये होती. **जो ज्याचे खाईल, तो त्याचे गुणगान गाईल!** काँग्रेसपासून इतर निवडणूक पक्षांपर्यंतच्या सरकारांनीही भांडवलदार वर्गाच्या कोणत्या ना कोणत्या हिश्श्याचीच सेवा केली आहे, पण संकटकाळात भांडवलदारांना अशा पक्षाची गरज आहे जो जनतेचे खऱ्या प्रश्नांपासून लक्ष विचलित करू शकेल, धर्माच्या नावावर त्यांना लढवू शकेल आणि त्यांचे दमन करू शकेल, म्हणजेच भाजप सारखा पक्ष. **भाजप आणि संघ परिवाराने पेरलेली फॅसिस्ट धार्मिक कट्टरता पुढे जाऊन ओवेसी, पीएफआय, अमृतपाल यांसारख्या धार्मिक कट्टरवादी शक्तींनाच फोफावण्याची संधी देते. जातीयवादी आणि धार्मिक कट्टरतावादी राजकारणामुळे नेहमीच सर्वसामान्यांच्या जीवनाचा आणि मालमत्तेचा नाश होतो. कधीच कुठल्या योगी किंवा ओवेसी यांचे घर जळत नाही.**

> **भाजपला कंपन्यांकडून देणगी**
> 2021-22 मध्ये 615 कोटी रुपये
> **भाजपची संपत्ती**
> 2017 मध्ये 1,213 कोटी रुपये
> 2020 मध्ये 4,847 कोटी रुपये

**भगतसिंह बरोबरच म्हणाले होते की, लोकांना एकमेकांशी लढण्यापासून रोखण्यासाठी वर्गजाणिवेची गरज आहे. ही गोष्ट आजही खरी आहे.** कष्टकरी जनतेचा जाती-धर्म-भाषा-प्रदेश कोणताही असो, त्यांच्या समस्या सारख्याच असतात, त्यांना लुटणाऱ्या शक्तीही सारख्याच असतात. आपण आपली एकजूट निर्माण करून संघर्ष केला तर आपले अधिकार मिळवू शकतो. **खऱ्या धर्मनिरपेक्षतेसाठी राजकारण आणि समाजजीवनापासून धर्माला पूर्णपणे वेगळे करण्याची मागणी आपण उचलली पाहिजे. अन्यथा धार्मिक कट्टरता आणि धर्मवादाच्या राजकारणाचा राक्षस आपल्याला भस्म करून टाकेल, जसे अनेक देशांमध्ये झाले आहे. आपण सर्व प्रकारचा धर्मवाद नाकारला पाहिजे.**

**साथींनो, जीवनाशी निगडित वास्तविक प्रश्नांवर एकजूट निर्माण करून आपल्याला एक नवीन सुरुवात करावी लागेल.** शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा, निवास, सामाजिक-आर्थिक सुरक्षा, लोकशाही हक्क, खरी धर्मनिरपेक्षता आणि लोकाभिमुख संस्कृती आणि मूल्ये प्रदान करण्यात सध्याची व्यवस्था अपयशी ठरली असेल, तर ती दूर करून नवीन जनतेच्या बाजूची व्यवस्था उभी करावी लागेल ज्यात उत्पादन, राज्ययंत्रणा आणि समाजाच्या संपूर्ण संरचनेवर उत्पादक कष्टकरी जनतेचे नियंत्रण असेल. पण या दूरगामी ध्येयाकडे वाटचाल करण्याची सुरुवात आपण आपले मूलभूत हक्क म्हणजे शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा, घर मिळवण्यासाठी सरकारला घेरून आणि त्यासाठी संघर्ष करून करावी लागेल. या संघर्षासाठी जनतेचे प्रबोधन करण्यासाठी '**भगतसिंह जनअधिकार यात्रा**' सुरू करण्यात आली आहे. ही

## आमच्या प्रमुख मागण्या

- ◊ शिक्षण-रोजगार-आरोग्यसेवा-निवास हे मूलभूत हक्क म्हणून घोषित करावेत. खाजगीकरणावर बंदी घालावी, सर्व रिक्त पदे त्वरित भरण्यात यावी. **भगतसिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायदा** मंजूर करावा, रोजगार देऊ शकत नसल्यास किमान 10,000 रुपये बेरोजगारी भत्ता द्यावा. केंद्र आणि राज्य सरकारमधील सर्व रिक्त पदे त्वरित भरण्यात यावी. 'अग्नीवीर' योजना तात्काळ रद्द करून लष्करात कायमस्वरूपी भरतीची व्यवस्था पूर्ववत करावी.
- ◊ सर्व कामगार कायद्यांना काटेकोरपणे लागू करण्यात यावे, प्रस्तावित चार कामगार संहिता रद्द करण्यात याव्यात. कंत्राटी पद्धत रद्द करून नियमित स्वरूपाच्या कामात कायमस्वरूपी रोजगाराची व्यवस्था करावी.
- ◊ महागाई रोखण्यासाठी **सर्व अप्रत्यक्ष कर रद्द करावेत** आणि वाढत्या संपत्तीच्या आधारावर **प्रगतीशील प्रत्यक्ष कर प्रणाली** कठोरपणे अंमलात आणावी. पेट्रोल, डिझेल, गॅस वरचे कर रद्द करावेत.
- ◊ **गरिब आणि मध्यम शेतकऱ्यांसाठी** बियाणे, खते, वीज इत्यादींच्या अनुदानाची योग्य व्यवस्था करण्यासाठी श्रीमंत वर्गावर विशेष कर लादण्यात यावा, सिंचनासाठी सरकारी व्यवस्था आणि **संस्थात्मक कर्जाचीही** योग्य व्यवस्था करण्यात यावी.
- ◊ **मनरेगा योजनेची** काटेकोर अंमलबजावणी करावी, वर्षभर काम देण्याची तरतूद करावी आणि यासाठी किमान वेतन दिले जावे.
- ◊ "सर्व धर्म समभाव"च्या बनावट धर्मनिरपेक्षतेच्या जागी खरे धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण करण्यासाठी कायदा आणावा. सार्वजनिक जीवनात कोणत्याही नेत्याने किंवा पक्षाने धर्म, समुदाय किंवा श्रद्धेचा उल्लेख व वापर करणे हा दंडनीय गुन्हा घोषित करण्यात यावा.
- ◊ **केवळ अस्पृश्यताच नाही तर कोणत्याही स्वरूपातील जातीय भेदभाव हा दंडनीय** गुन्हा म्हणून घोषित करण्यासाठी घटनादुरुस्ती करावी.
- ◊ निवडणूकीतील सर्व पक्ष आणि सरकारकडून होणाऱ्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी सार्वजनिक लेखापरीक्षण आणि तपासाची व्यवस्था करावी.
- ◊ **महिलांसोबतच्या सर्व प्रकारच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक भेदभावाला समाप्त करून त्याविरोधात कठोर कायदे केले जावेत.**
- ◊ **धार्मिक-जातीय तेढ भडकवणाऱ्या आणि जातीय हिंसाचार व मॉब लिंचिंगमध्ये सक्रिय असलेल्या सर्व प्रकारच्या संघटना आणि पक्षांना दहशतवादी घोषित करण्यात यावे** आणि त्यांच्या नेत्यांवर आणि कार्यकर्त्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी.

चळवळ आपल्यासाठी आहे आणि आपली स्वतःची आहे. **तुम्ही देखील भगतसिंह जनअधिकार यात्रेत सहभागी व्हा.**

साथींनो, या काही मूलभूत मागण्या आहेत ज्यांचा थेट आपल्या जीवनाशी संबंध आहे. **यापैकी एकही मागणी अशी नाही की ती पूर्ण करता येऊ शकणार नाही. खरे तर जगातील अनेक देशांतील लोकांना यापैकी अनेक अधिकार उपलब्ध आहेत, जे त्यांनी लढून मिळवले आहेत. मग हे इथे का शक्य नाही?** जर एखादे सरकार लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नसेल तर त्याला सत्तेत राहण्याचा काहीही अधिकार नाही. तुम्ही आमच्याशी सहमत असाल तर वरील मागण्यांचा विचार करा, त्यावर एकजूट व्हा आणि त्या पूर्ण करण्याच्या लढ्यात आमची साथ द्या. धर्म-जात-प्रदेश-भाषा इत्यादी भेदभाव विसरून आपण एकत्र येणे ही काळाची गरज आहे. जर आज आपण संघर्ष केला नाही तर भविष्य आपल्याला कधीच माफ करणार नाही.

यात्रेला आर्थिक सहयोग देण्यासाठी स्कॅन करा

यात्रेच्या व्हाट्सअप ग्रुपला सामील होण्याकरिता स्कॅन करा

# ●भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष (RWPI)

**●नौजवान भारत सभा ●दिशा विद्यार्थी संघटना ●महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन ● स्त्री मुक्ती लीग**

**पुणे संपर्क पत्ता:** स्वामी समर्थ मंदिराजवळ, सुपर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे – 38

**संपर्क:-** दिल्ली: 9289498250, 9693469694; उत्तर प्रदेश: 8858288593, 9891951393; हरियाणा: 8010156365, 8685030984; **महाराष्ट्र: 7798364729, 9619039793**; बिहार: 6297974751, 7070571498; उत्तराखंड: 9971158783, 7042740669; पंजाब: 9888080820; आंध्र प्रदेश: 7995828171, 8500208259; तेलंगाना: 9971196111; चंडिगढ: 8196803093

@bsjayatra 9582712837

भगतसिंह जनअधिकार यात्रेकरिता परमेश्वर जाधव यांच्याकडून पुणे येथे प्रकाशित, 20 मार्च 2023